**<u>नियमित दिवाणी दावा १४/२०२१</u>**

**पराग पाटील वि. महाराष्ट्र सरकार व इतर**

**<u>CNR No. MHSO060014822021</u>**

## <u>निशाणी १९ व ५ वरील आदेश</u>

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचेविरुद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द हक्क शाबीतीसाठी व अनुषांगिक दाद म्हणून निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्याचे कामी नि.नं.५ वर तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज देवुन, प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी सदर आदेशाचे अनुषंगाने वादीचे मालकी हक्कास व कब्जे वहिवाटीस कमीपणा येईल, हरकत अडथळा होईल अथवा दावा मिळकतीचे हक्कपत्रकातून वादींचे नावाच्या नोंदी कमी होतील अशी, कोणतीही कृत्ये या दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो अदा करु नये अशी मागणी केलेली आहे. सदरचे अर्जावर न्यायालयाने यातील प्रतिवादींना नोटीस काढणेबाबतचा आदेश पारीत केलेला होता. त्याप्रमाणे यातील प्रतिवादी नं. २ यांना तसेच अन्य प्रतिवादींनासुध्दा सदर दाव्याचे समन्सची व नि.नं.५ चे नोटीसीनी बजावणी न्यायालयाचे बेलीफामार्फत झालेली आहे. वरीलप्रमाणे यातील प्रतिवादींना प्रस्तुतचे दाव्याचे समन्सची व नि.नं.५ चे नोटीसीची बजावणी झालेनंतर हजर होवून अद्याप म्हणणे दाखल केले नाही.

३. वादी पुढे असे कळवितात की, प्रतिवादी नं.२ यांनी वादीस दावा मिळकती मधून बेदखल केलेस प्रस्तुत दाव्याचा तसेच नि.नं.५ चे अर्जाचा हेतु व उद्देश संपुष्टात येणार आहे. तसेच यातील वादीचे कधीही पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तरी वादी यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी खुलासा दाखल करून वादीच्या प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला आहे. आपल्या खुलासातून सदर प्रतिवादींनी असे कळविले आहे की, मुळ दावा पुर्नवसन कायदा कलम २४ व २५ नुसार टेनेबल नाही. त्यामुळे सदरचा अर्ज टेनेबल नाही. सदर दाव्यास जी कैफियत व म्हणणे देण्यात येत आहे त्यानुसार कामकाज चालवणे आवश्यक आहे. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादी यांच्या कथनाच्या अनुषंगाने माझे विचारार्थ अर्जाच्या निर्णयाकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष हे यानंतर नमूद केलेल्या कारणमिमांसेला अनुसरून पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे काय ? | ...होय. |
| २. | न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने आहे काय ? | ...होय. |
| ३. | अंतरिम मनाईहुकुम मिळाला नाही तर त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादीने सिद्ध केले आहे काय ? | ...होय. |
| ४. | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

६. दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याच्या कामी दाखल असलेल्या कागदपत्रांची पाहणी केली.

**वादप्रश्न क्र. १ ते ३ करीता -**

सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांची चर्चा एकत्रितरीत्या करण्यात येत आहे.

७. प्रस्तुतचा दावा वादीने ठराव, ताकीदकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जातून वादीने कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत, हे पाहणे गरजेचे आहे. आपल्या

अर्जातुन वादीने प्रतिवादी नं.२ यांनी पारीत केलेला दि.२२.०१.२०२१ रोजी क्र../पुनर्व/३/सातारा/कोयना/आर.आर./८५०/२१/प्र.क्र.८०/२० या आदेशाप्रमाणे कोणतीही कारवाई करुन वादींचे दावा मिळकतीमधील असलेले शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा अथवा बाधा अगर व्यत्यय निर्माण होतील अशी कोणतीही कृत्ये व दावा मिळकतीचे हक्कपत्रकातुन वादींचे नावाच्या नोंदी कमी होतील अशी कोणतीही कृत्ये नि.नं.५ चे अर्जाचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो करु नये म्हणून अंतरीम तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना देणेत यावी.

८. वादीचे विद्वान वकिलांनी आपले युक्तीवादात वादी हे दावा मिळकतीचे कश्याप्रकारे मालक व ताबेदार झालेले आहेत याबाबत दाव्यातील कथनांप्रमाणे उल्लेख केलेला आहे. वादी सध्या दावा मिळकतीचे वहिवाट करुन उपभोग घेत आहेत. असे असतानाही प्रतिवादी क्र. २ यांनी दि.२२.०१.२०२१ रोजी क्र../पुनर्व/३/सातारा/कोयना/आर.आर./८५०/२१/प्र.क्र.८०/२० हा आदेश पारीत करुन दावा मिळकतीवरील वादीचे हक्कावर व कब्जे वहिवाटीस बाधा निर्माण केलेली आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने प्रतिवादी हे वादीस दावा मिळकतीतून बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. असे झाल्यास वादीचे कश्यानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे त्यामुळे अर्ज मंजूर होणे गरजेचे आहे असे वादीचे म्हणणे आहे.

९. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींनी आपला खुलासा सादर केलेला आहे. आपल्या खुलास्यात सदरचा दावा हा पुनवर्सन कायदा कलम २४ व २५ नुसार न टिकण्याजोगा आहे. त्यामुळे सदरचा अर्ज देखील कायदयाप्रमाणे चालू शकत नसून अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आलेली आहे.

१०. प्रस्तुतचा दावा हा कायदयाप्रमाणे टिकण्याजोगा आहे की नाही ही बाब स्वतंत्र अर्जाव्दारे निश्चित करता येईल मात्र दावा मिळकतीवरील वादीची कब्जे वहिवाट प्रतिवादींनी नाकारलेली नाही. अश्या परिस्थितीत सदर आदेशाच्याव्दारे प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा केल्यास अथवा त्यांना बेदखल करण्याचा प्रयत्न केला तर त्यांचे फार मोठे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादी हे दावा मिळकतीचे खरेदीखताने मालक झालेले आहेत. त्यामुळे कोणतेही कायदेशीर

प्रक्रियेचा अवलंब न करता ते वादीस दावा मिळकतीतून बेदखल करता येणार नाही. तरी वादीस सकृतदर्शनी केस आहे.  न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने झुकणारा आहे. अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नूकसान होणार आहे. म्हणुन मी मुद्दा क्र १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत असुन मुददा क्र ४ चे उत्तर देण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

**आदेश**

१. वादीचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे की, प्रतिवादी नं.२ यांनी पारीत केलेला दि.२२.०१.२०२१ रोजी क्र../पुनर्व/३/सातारा/कोयना/आर.आर./८५०/२१/प्र.क्र.८०/२० या आदेशाप्रमाणे कोणतीही कारवाई करुन वादींचे दावा  मिळकतीमधील असलेले शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस हरकत,  अडथळा अथवा बाधा अगर व्यत्यय निर्माण होतील अशी कोणतीही कृत्ये दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत स्वतः अथवा इतरामार्फत करू नये.

SARIKA SANDEEP PAKHALE
Digitally signed by SARIKA SANDEEP PAKHALE
Date: 2026.05.07 13:47:52 +0530

(श्रीमती एस. एस. पाखले)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पंढरपुर.

दि. ०६/०५/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shirsikar V. G. |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| Date | | 06/05/2026 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 06/05/2026 |
| Order uploaded on | : | 06/05/2026 |